ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

26

# *भारतीय सार्वजनिक उपक्रमातील निर्गुंतवणुक धोरण आणि फलनिष्पत्ती*

**डॉ .बाळासाहेब निर्मळ**

Devgiri College Aurangabad

भारतीय सार्वजनिक उपक्रमाबाबत खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीकरणाची चर्चा मुलतः या उपक्रमांचे असंतोषजनक कार्यनिष्पादन, कमीत कमी नफा, खालावलेली उत्पादकता, भांडवल गुंतवणुकीचे चुकीचे निकष आणि प्रतिस्पर्धाचा अभावामुळे हे उपक्रम सफेद हात्ती सिध्द झाले. त्यामूळे या क्षेत्रावर आणि नियोजनकर्त्यावर मोठ्या प्रमाणात टिका होत असताना 1991 च्या धोरणानंतर सार्वजनिक उपक्रमांमध्ये सुधारणा करण्यासाठी निर्गुंतवणूक आणि खाजगीकरणाची चर्चा सरु झाली.

सामान्यतः खाजगीकरण आणि निर्गुंतवणुकीकरण हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जात असले तरी यामध्ये मुलतः फरक आहे. निर्गुंतवणूक म्हणजे सरकारव्दारे सार्वजनिक उपक्रमामध्ये गुंतवणुक केलेल्या एकूण रक्कमेच्या काही रक्कम शेअर्स माध्यमातून विकणे होय. म्हणजे त्या उपक्रमामध्ये सरकारचा वाटा अधिक असून या उपक्रमावर सरकारचेच नियंत्रण असते. निर्गुतवणूकीचा मुख्य उद्देश सार्वजनिक उपक्रमांच्या वित्तीय संसाधनाच्या समस्या सोडविणे आहे. तर खाजगीकरण म्हणजे सरकारव्दारे सार्वजनिक उपक्रमामध्ये गुंतविण्यात आलेली रक्कम परत घेणे आणि सार्वजनिक क्षेत्र आणि सार्वजनिक उपक्रम कमी करणे असा आहे. म्हणजेच खाजगीकरण भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा पर्याय असून सरकारची भूमिका कमी करुन खाजगी क्षेत्राची भूमिका अधिक असते.

भारतामध्ये सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरणाची चर्चा 1990 च्या दशकात होत असली तरी खाजगीकरणासंबधी शिफारस विविध तज्ञ अभ्यास गटाकडून 60 च्या दशकामध्ये देखील करण्यात आली होती.1955 मध्ये कृष्ण मेनन समितीने 25% शेअर्स जनतेला विकण्यांची शिफारस केलेली होती. तसेच मोहम्मद युनुस पॅनलने एअर इंडिया आणि इंडियन एअरलाइन्स चे काही प्रमाणात खाजगीकरण करण्याची शिफारस केली होती. भारत सरकारने सार्वजनिक उपक्रमामबाबत खाजगीकरनाचे धोरण राबताना सरळ खाजगीकरणाचा मार्ग न स्वीकारताना उपक्रमांचे खाजगी व्यवस्थापन, विराष्ट्रीयकरन ,संयुक्त उपक्रमांची स्थापना, पट्टेदारी करार, आरक्षित क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्रांना प्रवेश इत्यादी प्रारुपात खाजगीकरणाची प्रक्रिया राबविली जात आहे. त्यामध्ये निश्चित उद्देश असून याच्यामाध्यमातून सार्वजनिक क्षेत्रात प्रतिस्पर्धाची क्षमता विकसित करणे, उपक्रमावरील बाह्य कर्जाचे प्रमाण कमी करुन उत्पादकता आणि परिचालन क्षमतेत वाढ करणे, वस्तू आणि सेवांची गुणवत्ता वाढविणे व देशी गुंतवनूकीस प्रोत्साहन देणे, निर्यात वाढवुन आयात कमी करणे तसेच सरकारी घाट्यामध्ये कपात करुन सरकारला विविध नवीन करांचे स्त्रोत निर्माण करणे, सार्वजनिक क्षेत्रातील सरकारचा हस्तक्षेप कमी करुन आजारी उद्योगाचे पुनर्गठण करणे. इत्यादी उद्देश समोर ठेवून आज देशात खाजगीकरणाची प्रक्रिया ही उदारिकरणाचा एक भाग म्हणून राबविली जात आहे.

**सार्वजनिक उपक्रम आणि निर्गुंतवणूकः**

निर्गुंतवणूक हा खाजगीकरणाचा एक महत्वाचा मार्ग आहे. निर्गुंतवणूक म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामधील शासनाने धारण केलेल्या समभागाचा काही भाग खाजगी गुंतवणुकदारास विकणे होय. 51% अधिक समभाग विकल्यास प्रभावी खाजगीकरण घडवुन येते, तर 100% समभाग विकल्यास पुर्ण खाजगीकरण घडून येते. भारतामध्ये निर्गुंतवणूकीची सुरुवात 1991 मध्ये करण्यात आली.

सार्वजनिक उपक्रमांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी भारत सरकारने 24 जुलै 1991 ला औद्योगिक धोरण जाहीर केले. या धोरणात अन्य तरतुदीबरोबरच एक महत्वाची तरतूद सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणूकीची होती. सार्वजनिक उपक्रमातील शासनाच्या भागधारणेचा काही अंश म्युच्यअल फंडस्, वित्त संस्था आणि सामान्य जनता

व कामगारांना खरेदीसाठी उपलब्ध केला जाईल. मूळात हे धोरण स्वीकारण्यांची गरज निर्माण झाली होती. कारण या लोकउद्योगाचे असंतोषजनक कार्यनिष्पादन, कमीत कमी नफा, कमी उत्पादकता, दोषपुर्ण प्रशासकीय कामकाज प्रणाली, स्पर्धात्मक वातारणाचा अभाव यामुळे सार्वजनिक क्षेत्र संकटात सापडले होते. यासाठी हे अंशिक निर्गुंतवणूकीचे धोरण संकटात सापडलेल्या सार्वजनिक उपक्रमांना मदत करण्यासाठी स्वीकारले आहे.

1991 च्या अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग म्हणाले, *‘व्यापक निधी उभारने, अधिक सहभाग उत्तेजित करणे आणि जबाबदार उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी यशस्वी वाटचालासाठी नाव असलेल्या निवडक सार्वजनिक उपक्रमांचे 20 टक्के सहभाग म्युच्युअल फंड, वित्त संस्था, कामगार आणि सामान्य जनता यांना उपलब्ध करुन देणे. याबरोबरच सार्वजनिक क्षेत्राच्या सुधारणाखेरिज मुबलक द्रव्य निधी उपलब्ध व्हावा असाही या धोरणामागील उद्देश होता’.* निर्गुंतवणूकीच्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने एप्रील 1993 मध्ये रंगराजन समितीची स्थापना केली. या समितीने आपल्या अहवालामध्ये निर्गुंतवणूक प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वतंत्र निर्गुंतवणूक आयोग स्थापण्याची शिफारस करुन या संदर्भात तत्वे सागून निर्गुंतवणूकीसाठी स्ट्रॅटेजिक सेल पध्दतीचा स्वीकार करण्याची शिफारस केली.

**सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोगः-**

भारत सरकारने रंगराजन समितीच्या शिफारशीच्या आधारे 1996-97 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये निर्गुंतवणूक आयोग स्थापण करण्यांची घोषणा करण्यात आली. त्यानूसार 23 ऑगस्ट 1996 रोजी श्री. जी. व्ही. रामकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली तीन वर्षांच्या कालावधीसाठी एक स्वतंत्र, अवैधानिक व सल्लागार मंडळ म्हणून ‘सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोग’ ची स्थापना करण्यात आली.[26] नंतर या अयोगाचा कार्यकाल 30 नोव्होबर,1999 पर्यंत वाढविण्यात आला. आयोगाने 58 सार्वजनिक उपक्रमाच्या निर्गुंतवणकीबद्दल 12 अहवाल सादर केले. 25 उपक्रमामध्ये निर्गुंतवणूक स्ट्रॅटेजिक सेलच्या मार्गाने, तर 33 उपक्रमांमध्ये इतर मार्गाने करण्याची शिफारस करण्यात आली होती. याचा आधार घेवुन 16 मार्च 1999 रोजी सरकारने केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांचे विभाजन स्ट्रॅटेजिक आणि नॉन स्ट्रॅटेजिक क्षेत्रातील अशा दोन गटामध्ये करण्यात आले. स्ट्रॅटेजिक क्षेत्रामध्ये संरक्षण विषयक शस्त्रास्त्रे निर्तीती उद्योग, अणु उर्जा क्षेत्रातील उद्योग आणि रेल्वे वाहतूक क्षेत्रातील उद्योगाचा समावेश करण्यात आला.

**निर्गुंतवणूक विभागः**

सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये निर्गुंतवणूक धोरणाला गती देणे आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संयुक्त लोकशाही आघाडी सरकारने 10 डिंसेबर 1999 रोजी नवीन निर्गुंतवणूक विभाग स्थापण करण्यात आला. केंद्र शासनाच्या निर्गुंतवणुकीबाबतची सर्व प्रक्रीया पार पाडण्याची जबाबदारी या विभागावर सोपविण्यात आली. अरुण जेटली याच्याकडे या विभागाचा कार्यभार सोपविण्यात आला. 2004 मध्ये या विभागाला स्वतंत्र मंत्रालयाचा दर्जा देण्यात आला आहे. तेव्हा पासून हा विभाग सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये निर्गुंतवणूक धोरणाला गती देवून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे.

**व्दित्तीय सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोगः**

संयुक्त लोकशाही आघाडी सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये निर्गुंतवणूक धोरणाला गती देणे आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सरकारला सल्ला देण्यासाठी 24 जुलै, 2001 रोजी डॉ. आर. एच. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली दोन वर्षाच्या कालावधीसाठी व्दित्तीय सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाने 41 उपक्रमांच्या निर्गुंतवणूकीबाबत 13 अहवाल सादर केले. यामध्ये 334 उपक्रमांसाठी स्ट्रॅटेजिक सेल पध्दतीचा स्वीकार करण्यांची शिफारस करण्यात आली. नोव्हेंबर 2004 मध्ये हा आयोग संपुष्टात आला.

**राष्ट्रीय गुंतवणुक निधी (National Investment Fund)**

मे 2004 मध्ये कॉग्रेसचे युपीए सरकार सत्तेवर आल्यावर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये निर्गुंतवणूक धोरणात बदल करण्यात आले. यामध्ये स्ट्रॅटेजिक पध्दतीचा त्याग, केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांचे स्वरुप न बदलता आरंभिक सार्वजनिक पेशकश)Initial Public Offering किंवा अनुवर्ती सार्वजनिक पेशकश )Further

Public Offeringच्या मार्गाने सरकारच्या समभागातील छोट्या समभागाची विक्री (, राष्ट्रीय गुंतवणुक निधीची निर्मिती इत्यादी निर्णय घेण्यात आले. यानूसार 27 जानेवारी, 2005 रोजी सरकारने 'राष्ट्रीय गुंतवणुक निधी' स्थापण करण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील सरकारची अल्पमतातील भागिदारी विकुन प्राप्त पैसे ठेवण्यासाठी या निधीची निर्मिती करण्यात आली. या निधीची वैशिष्टये पुढीलप्रमाणे

- केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील सरकारची अल्पमतातील भागिदारी विकून प्राप्त पैसे या निधीमध्ये ठेवले जातात.
- हा निधी भारताच्या संचित निधीच्या बाहेर ठेवला जातो.
- या निधीतील धनसंचय कायमस्वरुपाचा असेल.
- या निधीतील धनसंचय कमी न होवु देता सरकरला शाश्वत परतावा मिळवुन देण्यासाठी निधीचे व्यावसायिक दृष्टीकोनातुन व्यवस्थापन केले जाईल. त्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील निवडक म्युच्युअल फंडाना निधीचे व्यवस्थापक म्हणून नेमले जाईल.
- सरकारने युटीआय, एसबीआय, आणि एलआयसी यांना म्युच्यूअल फंडाना निधीचे व्यवस्थापक म्हणून नेमले आहे.
- या निधीच्या वार्षिक उत्पन्नापैकी 75 टक्के रक्कम शिक्षण, आरोग्य व रोजगारविषयक सामाजिक क्षेत्रातील योजनांना वित्तपुरवठा करण्यासाठी वापरला जाईल. तर 25% उत्पन्न नफा मिळविणाऱ्या व पुनरुज्जीवनक्षम केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांच्या भांडवली गुंतवणूकीच्या गरजा भागविण्यासाठी वापरला जाईल. जेणे करुन विस्तार आणि विविधीकरणासाठी त्यांचा भांडवली पाया विस्तारु शकेल.

मात्र जागतिक आर्थिक मंदीच्या कारणामूळे निर्माण झालेल्या अवघड आर्थिक परिस्थितीशी सामना करण्यासाठी एप्रील 2009 ते मार्च 2013 पर्यंत या निधीच्या उत्पन्नाचा पुर्ण वापर सामाजिक क्षेत्र कार्यक्रमांच्या भांडवली गरजा भागविण्यासाठी वापरला जाईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

**युपीए सरकारचे निर्गुंतवणूक धोरण**

युपीए सरकारने 5 नोव्हेंबर, 2009 रोजी निर्गुंतवणुकीसाठी एक कृती योजना जाहीर केली. त्यानूसार निर्गुंतवणुक धोरण जाहीर करण्यात आले. त्यामध्ये पुढील बाबीना प्राधान्य देण्यात आले.

- सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांचे भाग धारण करण्यांचा प्रत्येक नागरिकाला हक्क असेल.
- सार्वजनिक क्षेत्र ही राष्ट्राची संपत्ती असून ही संपत्ती लोकांच्या हातात असावी.
- सरकार निर्गुतंणूकीचे धोरण राबविताना सरकार सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांमध्ये बहुमताची भागिदारी व व्यवस्थापन नियंत्रण स्वतःकडे राखील.
- सरकार निर्गुंतवणुकी संर्दभातील स्ट्रॅटेजिक पध्दतीचा त्याग केला जाईल. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांचे स्वरुप न बदलता आरंभिक सार्वजनिक पेशकश आणि अनुवर्ती सार्वजनिक पेशकश च्या मार्गाने सरकारच्या समभागातील छोट्या हिस्स्याची विक्री केली जाईल.
- निर्गुंतवणुकीच्या संर्दभातील सर्व केस-बाय-केस ठरविल्या जातील. कारण प्रत्येक उपक्रमाची समभाग रचना, वित्तीय स्थिती, निधी गरज, व्यवसायाचे क्षेत्र इत्यादी बाबी वेगवेगळ्या असतात.

सरकारचे हे निर्गुतणूकीचे धोरण जवळपास आक्टोबर 2014 पर्यत अस्तिवात होते. नंतर भाजपा प्रणित आघाडी सरकार सत्तेवर आले आहे. हे सरकार आपल्या जाहीरनाम्यानुरुप या मध्ये बदल करण्याची शक्यता आहे. कारण भारत सरकारने निर्गुतंणूकीचे धोरण 1991-92 मध्ये सुरु केले. त्यानंतरच्या दोन दशकांमध्ये सरकारच्या या धोरणात सातत्य राहिले नाही. सरकारच्या विचारसरणीनूरुप आणि प्रासंगिकतेप्रमाणे बदल झाल्याचे दिसते.

**सार्वजनिक उपक्रम आणि निर्गुंतवणूक धोरणाची फलनिष्पत्ती**

1991 च्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक उपक्रमाबाबत केलेल्या महत्वाच्या सुधारणांपैकी एक सार्वजनिक उपक्रमांच्या समभागाच्या निर्गुंतवणुकीशी संबधीत आहे. या उपक्रमांच्या समभागाची निर्गुंतवणूक

करण्यामागे सरकारची भूमिका सार्वजनिक उपक्रमामधील नियंत्रण व्यवस्था सुधारणे, सार्वजनिक उपक्रमांची उत्पादकता वाढविणे व निर्गुंतवणुकीच्या माध्यमातून या उपक्रमांत लोकांचा सहभाग वाढविणे आणि सरकारचा वाढत जाणारा राजकोषीय घाटा कमी करणयास मदत करणेइत्यादी . प्रमूख उद्दिष्टे निर्गुंतवणूक धोरणामागे सरकारने स्पष्ट केले होतेही प्रक्रिय .ा अधिक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी निर्गुंतणूकीसंदर्भात भारत सरकारने 'स्ट्रॅटेजिक आणि ' 'नॉन स्ट्रॅटेजिक' या पध्दतीचा स्वीकार करण्यात आला आहे. त्याचबरोबर या संदर्भात सरकारला योग्य सल्ला आणि मार्गदर्शन करण्यासाठी काही संवैधानिक संस्थाची निर्मिती केली आहे. सरकारने निर्गुंतवणूक धोरणाची अंमलबजावणी करताना प्रत्येक वित्तीय वर्षात निश्चित रक्कम जमा करण्यांचे निश्चित करुन हे साध्य करण्यासाठी ज्या उपक्रमामध्ये सरकारचे 100% भाग भांडवल आहे. त्यापैकी 20% पर्यंत समभागाची विक्री करणे. आणि त्यामधुन पैसा उपलब्ध करण्याची सरकारची भुमिक होती.[18] परंतु सरकारला निर्गुंतवणूक धोरण राबवताना प्रत्येक वित्तीय वर्षात निश्चित रक्कम जमा करण्यांचे उद्दिष्ट साध्य करण्यात सरकारला किती यश आले. याचा आढावा तक्ता क्रं. 4.21. घेतला आहे.

**तक्ता क्रं. 4.21**

**निर्गुतणूकीतनुकीच्या माध्यमातुन साध्य झालेला निधी**

| Sr. No. | Year | Budget Estimates | Actual |
|---|---|---|---|
| 1. | 1991-92 | 2500 | 3037.74 |
| 2. | 1992-93 | 2500 | 1912.51 |
| 3. | 1993-94 | 3500 | - |
| 4. | 1994-95 | 4000 | 4843.10 |
| 5. | 1995-96 | 7000 | 161.48 |
| 6. | 1996-97 | 5000 | 379.67 |
| 7. | 1997-98 | 4800 | 910.00 |
| 8. | 1998-99 | 5000 | 5371.11 |
| 9. | 1999-00 | 10000 | 1860.14 |
| 10. | 2000-01 | 10000 | 1871.26 |
| 11. | 2001-02 | 12000 | 5637.69 |
| 12. | 2002-03 | 12000 | 3347.98 |
| 13. | 2003-04 | 14500 | 15547.41 |
| 14. | 2004-05 | 4000 | 2764.87 |
| 15. | 2005-06 | --- | 1569.68 |
| 16. | 2006-07 | ---- | - |
| 17. | 2007-08 | -- | 4181.39 |
| 18. | 2008-09 | ---- | -- |
| 19. | 2009-10 | --- | 23552.93 |
| 20. | 2010-11 | 40000 | 22144.21 |
| 21. | 2011-12 | 40000 | 13894.05 |
| 22. | 2012-13 | 30000 | 23956.06 |
| 23. | 2013-14 | 40000 | 15819.45 |
| | total | | |

**Public Enterprises Survey-2005-06, 2013-14**

तक्ता क्रं. 4.21. चे विश्लेषण केले असता असे दिसून येते की भारतामध्ये सार्वजनिक उपक्रमात 1991-92 या वित्तीय वर्षापासून निर्गुंतवणूक धोरणाची अंमलबजावणी चालू असून 1991-92 ते 2103-14 म्हणजेच जवळपास 24 वर्षातील विविध वित्तीय वर्षामध्ये सार्वजनिक उपक्रमांच्या मध्ये निर्गुंतवणूकीच्या माध्यमातून सरकारकडे उपलब्ध होणाऱ्या निधीचा बजेट मध्ये दिलेला अंदाज आणि प्रत्यक्षात प्राप्त यामध्ये तफावत असून निश्चित ध्येय आणि प्रत्यक्षात उपलब्ध निधी यात फरक आहे .

1991-92 मध्ये सरकारने सार्वजनिक उपक्रमामध्ये निर्गूतवणुक करताना बोली प्रक्रियाच्या माध्यमातून 2,500.00 कोटी रु. जमा करण्याचे प्रावधान केले होते परंतु सरकारला या पेक्षा अधिक म्हणजेच 3037.74 कोटी रुपये प्राप्त झाले त्या नंतर सरकाराला विविध वित्तीय वर्षामध्ये 1992-93 ते 2013-14 निर्धारित निधी जमा करण्यात आला नाही यावरुन असे दिसून येते की सार्वजनिक उपक्रमात सरकारला निर्गुंतवणूकीची प्रक्रिया प्रभाविपणे राबविण्यात सरकारला यश प्राप्त झाले नाही.

सार्वजनिक उपक्रमामधील मागील 24 वर्षातील निर्गुंतवणीच्या माध्यमातून अंदाजपत्रकातील तरतूदीनुसार उपलब्ध होणारी रक्कम कोटी रुपये 246800 होतीमात्र सरकारला या ,पैकी पक्त 152789.72 कोटी रूपये मिळविण्यात यश आले. परंतु ही रक्कम एकूण मिळणाऱ्या रक्कमेच्या 61.90% इतकी आहे. म्हणजेच सरकारला विविध सार्वजनिक उपक्रमांमध्ये निर्गुंतवणूकीची प्रक्रिया राबविणे शक्य झाले नाही. कारण दरम्यानच्या काळात अस्थिर सरकार आणि कामगार संघटना आणि डाव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षानी या धोरणाला केलेला विरोध हे प्रमूख कारणे होती.

सरकारने सार्वजनिक उपक्रमांत निर्गुतवणूकीची प्रक्रिया राबविताना सार्वजनिक उपक्रमांचे अल्पश शेयरची विक्री, एका सार्वजनिक उपक्रमाकडून दुसऱ्या सार्वजनिक उपक्रमांनी केलेल्या शेअर्स विक्रीच्या माध्यमातून, कार्यनितीक विक्री इत्यादी प्रक्रियांच्या माध्यमातून सरकारने या धोरणाची अंमलबजावणी केली. यामध्ये उपलब्ध झालेल्या रक्कमेपैकी अल्पाश शेयरची विक्रीमधुन 134724.70, कोटी रूपये मिळविण्यात आले तर एका सार्वजनिक उपक्रमाकडून दुसऱ्या सार्वजनिक उपक्रमांनी केलेल्या शेअर्स विक्रिच्या माध्यामातून 1317.23 कोटी रूपये, कार्यनितीक विक्री 6344.35, कोटी रूपये, अन्य संबधीत सौद्यांच्या माध्यमातुन 4005.17 कोटी रूपये तर निर्गुतंवणुकदार कंपण्यांनी अन्य कंपण्यांशी शेअर्सची विक्री करुन प्राप्त केलेला निधी 6398.27 कोटी रुपये सरकाराला प्राप्त झाले. यामध्ये सर्वाधिक निधी अल्पशा शेयरची विक्रीमधुन प्राप्त झाला असून त्याचे प्रमाण एकूण रक्कमेच्या आहे. म्हणजेच निर्गूतंवणूक च्या माध्यमातून सामान्य जनतेची भागिदारी 25% आहे. परंतु सरकारने 2005 पर्यंत निर्गूतंवणूकीच्या माध्यमातून जमा झालेल्या पैशाचा उपयोग सरकारने केंद्रीय सरकारी उपक्रमांचे सुदृढीकरण, आधुनिकीकरण, पुनर्संरचना आणि पुनर्गठन करण्यावर न करता चालू वर्षातील वित्तीय तूट कमी करण्यासाठी वापरण्यात आल्याने विरोधक आणि अभ्यासकांनी सरकारच्या या धोरणावर टिका व कामगार आणि विरोधी पक्षानी याला विरोध केल्याने या उपक्रमांच्या माध्यमातून सरकारकडे जमा होणाऱ्या निधीसाठी 2005 मध्ये राष्ट्रीय विनियोग कोष निर्माण करण्यात आला आहे.

या कोषामध्ये 2013 पर्यंत एकूण 83548 कोटी रुपयांचा निधी जमा झाला होता. तो निधी सरकारने जवाहरलाल नेहरु शहरी नवीकरण मिशन, त्वरित सिंचन लाभ कार्यक्रम, राजीव गांधी राष्ट्रीय ग्रामिण विद्युतीकरण योजना, राष्ट्रीय रोजगार हमी योजना आणि इदिरा आवास योजना या विकास योजनावर हा निधी खर्च केला असून 2013-14 मध्ये प्राप्त होणारा निधी रेल्वेमध्ये भांडवली निधी म्हणून खर्च करण्यात येणार असल्याचे सरकारने घोषीत केले आहे. परंतु सरकारने हा निधी उपक्रमांचे सुदृढीकरण, आधुनिकीकरण, पुनर्संरचना आणि पुनर्गठन करण्यावर खर्च करणे अपेक्षित असताना तो निधी सामाजिक क्षेत्रात खर्च केला जात आहे.

1) Kadam Subesh (May 2014) Disinvestment Policy in India, Asian Journal of Multidisciplinary Studies, Volume-II, Issue 5.
2) दत्त एवं सुन्दरम (2012),भारतीय अर्थव्यवस्था, एस.चन्द एण्ड कम्पनी लि.नई दिल्ली,पृ.क्रं. 16.
3) कटारिया सुरेन्द्र (2007), आर्थिक नीती एवं प्रशासन ,मलिक एण्ड कम्पनी जयपूर
4) माथुर बी. एल. (2007) 'आर्थिक नीति एवं प्रशासन', आर बीएसए पब्लिशर्स, जयपूर,.

5) विश्व संवाद केंद्र (2015), मुंबई सार्वजनिक क्षेत्रातील बदलाचे वारे, http.//www.vskmumbai.org/print.

6) Kadam Subesh (May 2014) Disinvestment Policy in India, Asian Journal of Multidisciplinary Studies, Volume-II, Issue 5.

7) Misra, Puri (2011) Indian economy, Himalaya publishing house, P. No.412, 413.

8) Patkar S. B.(2012) Disinvestment of public sector enterprises in India: An overview. www.damodarcollege.org/dhiru_final/santoshvol3.1.html

9) http://divest.nic.in/hindi1/default.asp

10) mishra R. K., Navin B. (2002) Restricting public Enterprises in India- privatization and Disinvestment, mittal publications, New Delhi, p. 1-10.

❑❑❑